अँन्टी करप्शन ब्युरो,जळगांव
दि१२.०२.२०२५

प्रेस नोट

**१)जिजाबाई गणेश पाटील,वय ४८ वर्षे,सरपंच,मेहु ग्रामपंचायत ता.पारोळा, रा.मेहु,ता.पारोळा. २) गणेश सुपडु पाटील,वय ५५ वर्षे, रा.मेहु,ता.पारोळा ३) शुभम गणेश देवरे (पाटील),वय २६ वर्षे, रा.मेहु,ता.पारोळा ४) समाधान देवसिंग पाटील,वय ३५ वर्षे,रा.बोदर्डे,ता.पारोळा यांना ४०,०००/—रूपये लाच स्विकारतांना अँन्टी करप्शन ब्युरो, जळगांव पथकाने रंगेहात पकडले.**

---0000000---

तक्रारदार यांचे मित्र श्री.विलास वाघ यांची मुलगी अश्विनी वाघ,रा.पारोळा यांचे धनश्री कन्स्ट्रक्शन कंपनीला मेहु गावी व्यायामशाळा बांधुन देण्याचे काम मेहु ग्रामपंचायत कडुन देण्यात आले होते. सदर व्यायामशाळा बांधकामासाठी प्राप्त झालेला ७ लाख रुपयांचा निधी मेहु ग्रामपंचायत कार्यालय येथुन धनश्री कन्सट्रक्शन कंपनीला मिळवुन देण्यासाठी फिर्यादी यांना अश्विनी वाघ,रा.पारोळा यांनी अधिकार पत्र दिले होते. त्याप्रमाणे फिर्यादी यांनी धनश्री कन्सट्रक्शन कंपनी कडुन मेहु गावी बांधण्यात आलेल्या व्यायाम शाळेच्या कामाचा पहीला टप्पा म्हणुन ४ लाख रुपयांचा चेक मेहु गावच्या सरपंच सौ.जिजाबाई पाटील यांच्याकडुन चेकद्वारे मिळवुन दिला होता. व उर्वरीत ३ लाख रुपये रक्कमेचा चेक हा मेहु ग्रामपंचायत कार्यालयाकडे बाकी होता. सदर उर्वरित ३ लाख रुपयांचा चेक फिर्यादीस देण्याचे मोबदल्यात ईलोसे क्र.१, त्यांचे पती आरोपी क्र.२ व मुलगा आरोपी क्र.३ यांनी फिर्यादीकडे प्रथम १ लाख रुपये लाचेची मागणी केले बाबत फिर्यादी यांनी दि.३१.०१.२०२५ रोजी ला.प्र.वि.जळगाव घटकाचे सापळा पथकाकडे तक्रार लिहुन दिली होती.

सदर तक्रारीची दि.३१.०१.२०२५, दि.०३.०२.२०२५, दि.०४.०२.२०२५ रोजी पडताळणी केली असता वर नमुद ईलोसे क्र.१, त्यांचे पती आरोपी क्र.२ व मुलगा आरोपी क्र.३ यांनी फिर्यादीचे मित्र श्री.विलास वाघ यांची मुलगी अश्विनी वाघ,रा.पारोळा हिचे धनश्री कन्स्ट्रक्शन कंपनी तर्फे मेहु गावात बांधलेल्या व्यायामशाळेचा शासनाकडुन प्राप्त झालेला उर्वरित ३ लाख रुपयाचा चेक देण्याचे मोबदल्यात प्रथम १ लाख रुपये, त्यानंतर ७० हजार व तडजोडी अंती ४० हजार रुपयांची मागणी केली.

त्याप्रमाणे दि.१२.०२.२०२५ रोजी झालेल्या यशस्वी सापळा कारवाई दरम्यान आरोपी ३ यांचे सांगणे वरुन सदर ४० हजार रुपये लाच रक्कम आरोपी क्र.४ याने त्याचे पारोळा पंचायत समिती कार्यालया समोर रोडवर असलेल्या आशिर्वाद ऑनलाईन सेंटर या दुकानात स्विकारली. त्यानंतर आरोपी क्र.३ हा सदर ठिकाणी आल्यानंतर आरोपी क्र.४ याने सदर लाच रक्कम आरोपी क्र.३ यास दिली. त्यानंतर सदर लाच रक्कमेसह त्यांना पकडण्यात आले म्हणुन वर प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**टिप :— सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, त्यांच्याकडे कोणत्याही शासकिय नोकराने त्यांचे शासकिय काम करुन देण्यासाठी शासकिय फी व्यतिरिक्त लाचेची मागणी केल्यास तात्काळ संपर्क साधावा.**

| | |
|---|---|
| **कार्यालयाचा पत्ता** | **अँन्टी करप्शन ब्युरो, जळगांव**<br>**अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, जळगांव** |
| **दुरध्वनी क्रमांक** | **०२५७—२२३५४७७** |
| **मोबाईल क्रमांक** | **९७०२४३३१३१** |
| **टोल फ्री क्रमांक** | **१०६४** |

पोलीस उप अधिक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो,जळगांव

योगेश जी. ठाकूर
पोलीस उप अधिक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो,जळगांव